महाराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद ■ बुधवार, १३ डिसेंबर २०१७ औरंगाबाद

# हवामान बदलावर चर्चासत्र

**औरंगाबाद :** 'जागतिक हवामान बदल व त्याचे कृषी जलक्षेत्रावर होणारे परिणाम' विषयावर राज्यातील कृषी विद्यापीठे, जल व भूमी व्यवस्थापन संस्थातर्फे १४ ते १६ डिसेंबर दरम्यान आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. देश-विदेशातील शास्त्रज्ञ, तज्ज्ञ यात सहभागी होणार आहेत, अशी माहिती वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. व्यंकटेश्वरलू यांनी पत्रकार परिषदेत दिली.

चर्चासत्राचे उद्घाटन एमजीएमच्या रुख्मिणी सभागृहात सकाळी १० वाजता नीती आयोगाचे सदस्य डॉ. रमेश चंद्र यांच्याहस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे माजी महासंचालक पद्मभूषण डॉ. आर. एस. परोडा, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथ दापोलीच्या कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तपस भट्टाचार्य, अकोल्याच्या पंजाबराव देशमुख, कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास भाले, डॉ. बर्व्हिन सन, एच. के. गोसावी, राजू बारवाले यांची प्रमुख उपस्थिती राहील. हवामान बदलावर आधारित उपकरणे, साहित्य आणि विविध पुस्तकांसह कंपन्यांचे पदर्शनही भरवले जाणार आहे. विविध १२ तांत्रिक सत्रांमध्ये विविध विषयांवर चर्चा होणार आहे. यावेळी आस्ट्रेलियातील जलतज्ज्ञ कार्ल डॉमेन, सहसंयोजक डॉ. सुनील गोरंटीवार, डॉ. अविनाश गरूडकर, डॉ. भगवान आसेवार, डॉ. अशोक ढवण, डॉ. दत्तप्रसाद वास्कर, डॉ. हेमंत पाटील, डॉ. कैलास डाखुरे, डॉ. बेग उपस्थित होते.

दैनिक दिव्य मराठी
औरंगाबाद. बुधवार, १३ डिसेंबर २०१७ | ३

# हवामान बदलावर उद्यापासून तीन दिवस शहरात आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

**औरंगाबाद** | जागतिक हवामान बदल व त्यांचे कृषी व जल क्षेत्रावर होणारे परिणाम या विषयावर चार कृषी विद्यापीठे व जल व भूमी व्यवस्थापन व अन्य संस्थांच्या वतीने १४ ते १६ डिसेंबरदरम्यान आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आल्याची माहिती वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. व्यंकटेश्वरल्लू यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

उद्घाटन १४ डिसेंबर रोजी एमजीएम रुख्मिणी सभागृहात सकाळी १० वाजता निती आयोगाचे सदस्य डॉ. रमेश चंद यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी पद्मभूषण डॉ. आर. एस. परोडा असतील. चर्चासत्र वाल्मीमध्ये होणार आहेत, असेही डॉ. बी. व्यंकटेश्वरल्लू यांनी सांगितले. या वेळी डॉ. अशोक ढवण, डॉ. दत्तप्रसाद वास्कर, डॉ. सुनील गोरंटीवार, डॉ. भगवान आसेवार, डॉ. बेग, वाल्मीचे महासंचालक एच. के. गोसावी आदी उपस्थित होते.